स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 27–04–2015** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 8. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 27:— ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ट्राफीक पार्कची 3 वर्ष कालावधीकरीता देखभाल व संचालन करण्याचा कंत्राट देण्याकरीता निविदा बोलविल्या असता प्राप्त निविदांपैकी उच्चतम किंमतीचे निविदाधारक मे. विभूती एन्टरटेंमेन्ट नागपूर यांना हा कंत्राट रूपये 3,01,000/– ला देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मनपा द्वारे जे शुल्क निर्धारीत केले आहे. यामध्ये वाहन तळ शुल्क, लहान मुलांचे प्ले झोन शुल्क व प्रवेश शुल्क यावर विभागाद्वारे योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील

नागरीकाकडून कुठलेही अवाजवी शुल्क निविदाकाराने स्विकारू नये यांची दक्षता विभागाची राहील या सुचनेसह विषयांस एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 28</u>:— नागपूर शहरातील सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर (NAG-016) या प्रकल्पाकरीता महाजेन्कोला रु. 10.00 कोटी मनपाच्या निधीतून मंजूर करुन वळते करण्याबाबतचा प्रश्न तसेच,

"Recycle & Reuse of Waste Water" NAG-016 हा रु. 130.11 कोटीचा मनपाने तयार केलेला प्रकल्प केन्द्रशासनाचे जेएनएनयुआरएम अंतर्गत दि. 22 डिसेंबर 2006 ला मंजूर करण्यात आला. यातील खर्चाचा 30 टक्के हिस्सा मनपा, व उर्वरीत हिस्सा 50 टक्के केन्द्रशासन व 20 टक्के राज्यशासन चा राहील. 4 ऑक्टोंबर 2008 ला मनपा व महाजेनको यांच्यात झालेल्या करारनाम्यानुसार मनपाचा खर्च (30 टक्के) हा महाजेनकोला करावयाचा आहे व प्रकल्प महाजेनकोच राबवित आहे.

महाजेनकोद्वारा उपरोक्त विषयांकित प्रकल्पावर आतापर्यंत रु. 165.00 कोटीचा खर्च झाला आहे. यापैकी रु. 106.00 कोटी महाजेन्कोद्वारे व उर्वरित रु. 59.09 कोटी केन्द्र व राज्यशासन मार्फत प्राप्त झालेला हप्ता (upto 3$^{rd}$ installment) महाजेनकोला वळता करण्यात आलेला आहे व 4 थ्या हप्त्याकरीता (रु. 22.76 कोटी) राज्यशासनामार्फत केन्द्रशासनाला मागणी करण्यात आलेली आहे.

केन्द्रशासनाच्या CSMC meeting द्वारे जेएनएनयुआरएम प्रकल्पांना मार्च 2014 नंतर निधी उपलब्ध करुन दिल्या जाणार नाही अशाप्रकारचा ठराव पारीत करण्यात आला असून मनपाद्वारे उपरोक्त प्रकल्पाच्या 4 थ्या हप्त्याची मागणी करण्यात आली असली तरी ती मिळण्याची शक्यता कमी आहे. सध्या या प्रकल्पाचे काम निधीअभावी थांबलेले आहे व याबाबत महाजेन्कोद्वारे बरेचदा मागणी करण्यात आलेली आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ येथे सुरु असलेल्या ''गोसीखुर्द धरणामध्ये नागनदीच्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबतची'' जनहित याचिका क्र. 38/2010 (Dharmik Foundation V/s. Others) मध्ये मनपाने सादर केलेल्या शपथपत्रात हा प्रकल्प जुलै 2015 पर्यंत कार्यान्वित करण्यात येईल असे कळविले आहे व यावर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये हा प्रकल्प जुलै 2015 पर्यंत कुठल्याही परिस्थितीत कार्यान्वित करावयाचा आहे. याद्वारे 130 द.ल.लि. प्रति दिन सांडपाण्यावर प्रक्रिया (Tertiary treatment) करुन याचा वापर महाजेन्को कोराडी स्थित औष्णिक विज केन्द्राकरीता करणार आहे. यामुळे नागनदीद्वारे गोसीखुर्द धरणात होणारे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल.

सबब, महाजेनकोला सध्यास्थितीत प्रकल्प पूर्णत्वास आणण्याकरीता मनपा निधीतून रु. 10.00 कोटी (रुपये दहा कोटी) मंजूर करुन वळते करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29</u>:— प्रभाग क्र. 16 अ आणि ब जयभिम चौक, आर.पी.एफ. क्वॉर्टर मागे, मारवाडीवाडी, तुलसीनगर येथे सिमेंट कॉक्रीट पेव्हमेंटचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 5 निविदा पैकी मे. द्वारका कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 9.75 प्रतिशतने अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरांपेक्षा 0.02 प्रतिशने कमी दराची रू. 32,91,699/— (बत्तीस लक्ष एक्याण्णव हजार सहाशे नव्याण्णव रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय

राशी रू. 29,99,270/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 30:— 1) प्रभाग क्र. 67—ब, सद्भावना नगर येथील रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी. के.नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 5.95 टक्के अधीक दराची रू. 28,60,648/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्थायी समिती ठराव क्र. 583 दिनांक 13.02.2015 अन्वये स्विकृत करण्यात आलेली आहे.

2) वरील प्रमाणे मंजूर ठरावात खालील प्रमाणे सुधारणा करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

मे. पी.के.नगरारे कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.95 टक्के अधिक दराची रू. 28,33,648/— राशीची सुधारीत निविदा मंजूरीस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 31:— प्रभाग क्र. 41 ब गाडीखाना, खिरूलाल वाडी, हॉरीजॉन कॉन्व्हेट व ढोबळी गल्ली येथे सिमेंट कॉक्रिंट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे. रझा कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दराची . 49,96,219/— (एकोणपन्नास लक्ष छाहाण्णव हजार दोनशे एकोणवीस रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 32:— महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा योजने अंतर्गत "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान " (जिल्हास्तर) अंतर्गत एकूण रू. 5,76,65,342/— रकमेचा 25 कामांचा प्रस्ताव शासनास सादर केला असून, एकूण रकमेच्या 50 टक्के रू. 2,88,32,671/— म.न.पा.चा सहभागास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच याकरीता म.न.पा. अंदाजपत्रकात नविन व्यय पदाचे निर्माण करून, त्यात रू. 2,88,32,671/— रकमेची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 33:— शासनाच्या मालकीची असलेली मौजा नारी येथील खसरा क्रमांक 45 न. भु.क्र. 406, आराजी 1.26 हे.आर. (13252.80 चौ.मी.) ही जागा स्मशान घाटाच्या उपयोगाकरीता जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेली आहे. सदर जागेवर स्मशान घाट सुरू करण्याकरीता आवश्यक असलेले दहन धाटाचे शेड, कार्यालयाकरीता रूमचे बांधकाम, तसेच जलावू लाकडे ठेवण्याकरीता शेडचे बांधकाम, विद्युत व्यवस्था, पाण्याची व्यवस्था इत्यादी सोई करण्यात आलेल्या आहे. दहन घाटावर कर्मचाऱ्यांची व्यवस्था इत्यादी झोन मार्फत करण्यात येईल. दहन घाटावर लाकूड

व गोवऱ्या पुरवठा करण्याकरीता येणार खर्च पद क्र. A23501141211 मधून भागविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 34</u>:— मंगळवारी येथे अत्याधुनिक मत्स मार्केट चे बांधकाम करण्यास्तव कंत्राटदार मे. जे. बी. कन्स्ट्रक्शन, यांची ४.९३ टक्केने अधिक रु. २,१३,२८,५२१/— ची निविदेस मंजूरी प्राप्त असून कंत्राटदारास कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत.

या कामाकरीता राष्ट्रीय मात्स्यिकी विकास बोर्ड, हैद्राबाद (NFDB) यांचे वेळोवेळी सुचनेनूसार स्थापत्यकामातील काही अतिरिक्त बाबींचा बांधकामामध्ये समावेश करणे गरजेचे असल्यामुळे बांधकामावरील आवश्यक खर्चात रु. १८,४१,७४९/— ने वाढ होत आहे. त्यामुळे (रु. २,१३,२८,५२१/— + रु. १८,४१,७४९/—) एकुण रु. २,३१,७०,२७०/— च्या सुधारीत खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 35</u>:— प्रभाग क्र. 67 ब, मानेवाडा दहन घाट येथे पार्कीग व्यवस्थेकरीता मानेवाडा नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब टाकण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. मुसळे डेव्हलपर्स यांची प्राकलनीय दरापेक्षा 24.21 टक्के कमी दराची रू. 65,50,700/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करणे व मे. विघ्नहर्ता कन्सलटींग इंजीनीअर यांची पी.एम.सी. म्हणून नेमणूक करणे तसेच सन 2015—16 चे अर्थसंकल्पातून पद क्र. A42501271705 मधून तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u>:— नागपूर शहरातील महत्वपूर्ण रस्ते सिमेंट कॉक्रींट चे करण्याकरीता शासनाकडून प्राप्त अनुदान व ना.सु.प्र. व म.न.पा. च्या समसहभागातून विस्तृत प्रकल्प अहवाल शासनास सादर करावयाचा आहे. या बाबत रस्त्यांची यादी तयार करण्यात आलेली असून परिशिष्ट 'अ' वर संलग्न आहे.

या यादीतील नमूद रस्त्यांचा समावेश सिमेंट कॉक्रींट चे रस्ते तयार करण्याचे प्रकल्पा अंतर्गत घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

(५२) मौलाना नातिक चौक ते कॉटन मार्केट चौक
(५३) बालाजी नगर नाला ते भगवान नगर शाळा
(५४) बसेश्वर पुतळा ते उदय नगर चौक
(५५) म्हाळगीनगर चौक ते गजानन शाळा

उपरोक्त वरील चार रस्ते परिशिष्ट 'अ' मध्ये समाविष्ट करून विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

परिशिष्ट 'अ'

## List of Roads Proposed Under Cement Road Project

| Sr. No. | Code No. | Name of Road | Total Length in Kms | Total width of Road in Mtr | Zone No. | Type of Road | Agency | Constituency | Type of Traffic | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | Untkhana Road- from Medical Chowk to Ashok Chowk | 0.85 | 30.00 | III | IRDP Pattern | NMC | South | MT | |
| | | | **0.85** | | | | | | | |
| 2 | PWD9 | South Ambazari road - From Rahate colony T Point on Wardha road to Ambazari T Point | 4.80 | 24.00 | I | IRDP | NMC | South West | MT | |
| 3 | W-8 | R.P.T.S. road- from WHC Road to Wardha road | 1.10 | 24.00 | I-IV | IRDP | NMC | West | MLT | |
| 4 | PWD12 | West High Court road -From Seminary Hill Japanese Garden SQ to MLA Hostel to Law College and from Laxmi Bhavan Sq. to Shankar Nagar Sq. | 3.20 | 24.00 | II | IRDP | NMC | West | MLT | |
| 5 | W-4 | East High Court road - From High Court Corner to Bhole Petrol Pump - to Alankar square ( including Stretch infront high Cour)t | 2.80 | 24.00 | I-II | IRDP | NMC | West- South West | MLT | |
| 6 | S-5 | Rameshwari road, Ambedkar square to Ring Road | 1.40 | 24.00 | III-IV | IRDP | NMC | South/ South West | MT | |
| 7 | E-4 | Road from Gurdeo Nagar Sq. to Bhande plot Sq. On Umrer road to chhota Tajbagh T Point | 1.60 | 24.00 | V | IRDP | NMC | south | MT | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | Road from Old Bagadanj road to Bhandara road through Chhapru colony in East Nagpur. | 1.40 | 24.00 | VIII | IRDP Pattern | NIT | East | MT | |
| 9 | | Gurudeo Nagar to Ishwar Nagar Square | 0.55 | 24.00 | V | CRIP | NMC | South | MT | |
| 10 | | Road from Ayodhyanagr CC Road -Sanjuba High School to Gajanan School to Ring Road | 2.20 | 24.00 | V | IRDP | NMC/NIT | South | MT | |
| 11 | | Road from Sunil Hotel to Telephone Exchange Sq. | 0.65 | 24.00 | VIII | IRDP | NMC | East | MT | |
| 12 | | Road from Mangalmurthi Sq. to Shitlamata Mandir | 1.00 | 24.00 | I | IRDP | NIT | South-West | M.T | |
| | | | **20.70** | | | | | | | |
| 13 | W-4 | East High Court road from Dikshabhoomi square to RPTS Road | 1.00 | 18.00 | I | IRDP | NMC | South West | MT | |
| 14 | CN-2 | Road From NIT Div. office to Kamptee road | 1.00 | 18.00 | IX | IRDP | NMC | North | MT | |
| 15 | N-2 | Road From Rani Durgawati square to NMC Cattle pond | 1.70 | 18.00 | IX | IRDP | NMC | North | MT | |
| 16 | N-4 | Road From Itarsi Rly. Over bridge to Nara road T point | 1.20 | 18.00 | IX-X | IRDP | NMC | North | LMT | |
| 17 | N-5 | Road From Ring road - CMPDI to Bhim chowk to Patankar square | 2.50 | 18.00 | IX | IRDP | NMC | North | LT | |
| 18 | CE-1 | Cradak Road from Rly. Under bridge to Golibar sq upto Itwari station road | 2.90 | 18.00 | VI / VII | IRDP | NMC | Central | MT | |
| 19 | CE-3 | Rly. Feeder road from Naka No. 13 to Badkas square to Lakdhi pool to Zenda Chowk | 3.00 | 18.00 | VI | IRDP | NMC | Central | LMT | |
| 20 | NE-1 | Itwari Rly. Station Road - Universal Pharmacy unit to Ring Road - Kawalapeth | 1.60 | 18.00 | VII | IRDP | NMC | East | MT | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | S-5 | Ridge road to Ambedkar Statute (Rameshwari Road) | 1.30 | 18.00 | III-IV | IRDP | NMC | South/ South West | MT | |
| 22 | W-5 | Park Road - Mahatma Gandhi NMC School T Point to L.A.D. college square. | 1.00 | 18.00 | II | IRDP | NMC | West | LMT | |
| 23 | W-8 | R.P.T.S. road from Madhav nagar square to WHC Road | 0.95 | 18.00 | I-IV | IRDP | NMC | South-West | LMT | |
| 24 | | Road from University Library square to Kalpana Building square | 0.58 | 18.00 | II-IV | IRDP Pattern | NMC | West | LMT | |
| 25 | | Road from Zero Mile to DCP Traffic Office road | 0.53 | 18.00 | II | IRDP Pattern | NMC | West | LMT | |
| 26 | | Road from RBI square to Bhartiya Vidya mandir | 0.17 | 18.00 | II | IRDP Pattern | NMC | West | LMT | |
| 27 | NIT-W-1 | Gaytri Mandir road (D.P. Road) South Ambazari road to Ring road through IT Park | 1.80 | 18.00 | I | IRDP | NIT | South west | LMT | |
| 28 | NIT E-8 | Road from Old Bagadganj Road to Ambedkar square to Sudarshan sq on Bhandara road | 1.20 | 18.00 | VIII | IRDP | NIT | South | HT | |
| 29 | | Jaripatka road from Kabrasthan to Kukreja nagar in North Nagpur | 0.80 | 18.00 | X | IRDP | NIT | West | LMT | |
| 30 | | Tekdi road-Ram nagar Sq. to North Ambazari road | 1.50 | 18.00 | II | CRIP | NMC | west | LMT | |
| 31 | | Bhagwan nagar road -From Trisharan chowk to Pragati colony road to Ring road via Banrjee lay out | 1.30 | 18.00 | IV | CRIP | NMC | South | LT | |
| 32 | NIT- E-1 | Shastrinagar Sq to KDK College to Shrikrusha nagar | 1.20 | 18.00 | V-VIII | IRDP | NIT | East | MT | |
| 33 | | Road from Balaji Nagar Nallah to Venu Corner | 0.70 | 18.00 | III | 0 | 0 | South West | MLT | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 34 | | Road from Sidhdeshwar Sabhagruha to Rajkamal Sq. | 1.50 | 18.00 | III | 0 | 0 | South West | MLT | |
| | | | **29.43** | | | | | | | |
| 35 | CN-2 | Road from Pachpaoli station to NIT Div. office | 1.25 | 15.00 | IX | IRDP | NMC | North | MLT | |
| 36 | C-1 | Road From C.A. Dosar Bhawan square to Cradak road | 0.80 | 15.00 | VI | IRDP | NMC | Central | LMT | |
| 37 | SE-1 | Road from Panchsheel square to Humpyard road | 0.80 | 15.00 | IV | IRDP | NMC | West | MT | |
| 38 | NIT E-5 | Road from Vidarbha Primear building on Ring Road to Hussain baba Dargh - via Ashirwad Nagar | 1.60 | 15.00 | V | IRDP | NMC | NIT | MT | |
| 39 | NIT E-7 | Road from Ayodhya nagar to Basweshwar statue | 0.45 | 15.00 | V | IRDP | NIT | south | MT | |
| 40 | | Road from Sakkardara Tank to Dattatraya nagar | 0.40 | 15.00 | V | IRDP Pattern | NIT | south | MT | |
| 41 | | Road from Dr. Hedgewar Gate Reshimbag to Gajanan chowk Sakkardara to Sangam Takies chowk | 1.05 | 15.00 | III | CRIP | NMC | South | LMT | |
| 42 | | Mahatma Fule school Orange Market road to Kamptee Road via Ashok Chowk | 0.95 | 15.00 | IX | CRIP | NMC | North | LMT | |
| 43 | | Road from Ring road near Narendranagar bridge to Vivekanandnagrar sq via Gajanannagr upto Devnagar square | 1.80 | 15.00 | I | CRIP | NMC | South West | LMT | |
| 44 | N-1 | Road From 10 No. bridge on kamptee road to Awale square | 1.40 | 15.00 | IX | IRDP | NMC | North | LMT | |
| 45 | NE-1 | Itwari Rly. Station Road from ROB approach to Universal pharmacy unit | 0.80 | 15.00 | VII | IRDP | NMC | East | MT | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 46 | | Friends colony road to Katol road to High land drive | 1.05 | 15.00 | X | CRIP | NMC | West | LMT | |
| 47 | | Lakdganj Kabra petrolpump to Nagpur Nagrik Bank | 1.50 | 15.00 | VIII | CRIP | NMC | East | HT | |
| 48 | | Road from Sakkardara CC Road to Laxmidevi Bajaj Ayurvedik Hospital | 0.70 | 15.00 | III | CRIP | NMC | MT | MT | |
| 49 | | Road from Ganesh Chowk to Chitra Talkies | 0.80 | 15.00 | VI | | NMC | Central | MLT | |
| 50 | | Road from Sudarshan Nagar Sq. to Annapurna dal Mill- Small Scale Industry | 0.50 | 15.00 | VIII | | NMC | East | HT | |
| 51 | | Road from Bhaosar Sq. to Tin Nal Sq. | 0.60 | 9.00 | VI | | NMC | Central | LMT | |
| | | | **16.45** | | | | | | | |
| **Total** | | | **67.43** | **Km** | | | | | | |

<u>ठराव क्रमांक 37</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर